थोडक्यात

## तीन बछड्यांसह मादी बिबट्या सापळ्यात

**मुखेड ।** मुखेड येथे ऊसतोडणी दरम्यान मजुरांना बिबट्याची तीन बछडे आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. तर यानंतर रात्रीच्या सुमारास वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्याची मादी जेरबंद झाली आहे. राजेंद्र सानप यांच्या शेतात ऊस तोडणी सुरू असताना मजूरांना बिबट्याचे तीन बछडे आढळून आले होते. यानंतर वनविभागाने तात्काळ या ठिकाणी पिंजरा लावला होता. शुक्रवारी (दि. २३) रात्रीच्या सुमारास या पिंजऱ्यात बिबट्याची मादी देखील कैद झाली. बिबट्याचे बछडे व मादीला वन'विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले. त्यांच्यावर उपचार करून त्यांना नैसर्गिक अधिवासामध्ये सोडून देण्यात येणार असल्याचे वन विभागाने सांगितले. दरम्यान, येवला तालुक्यात वाढता बिबट्यांचा वावर वाढल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

## अपघातात युवक ठार

**दिंडोरी ।** अपघाताच्या भीतीने रस्त्याच्या खाली वाहन उतरवत असताना बोलेरोने झाडाला धडक दिली. या घटनेत चालक ठार झाला.

कांतीलाल विलाराम मिणा (रा. करनपुरीय, उदयपूर, कुराडिया, राजस्थान) हा बोलेरो वाहन चालवत वणी- दिंडोरी मार्गावरुन मार्गक्रमण अनियंत्रित वेगात जात होता. परमोरी शिवारात चालकाचे लक्ष विचलित झाले. त्याचसुमारास समोरुन ओव्हरटेक करुन एक वाहन येत असताना या वाहनासोबत अपघात होईल, या भीतीपोटी त्याने वाहन रस्त्याच्या कडेला घेतले. मात्र गाडी झाडाला धडकली.

# त्र्यंबकेश्वरला हजारो भाविकांची गर्दी

### दर्शन रांग नियोजन कोलमडले

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

येथे शनिवार, रविवार आणि सोमवार अशा सलग सुट्ट्या आल्यामुळे लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. त्यामुळे पेडदर्शन आणि नियमित दर्शन रांगांचे नियोजन कोलमडले.भाविकांना सुमारे सहा ते नऊ तास दर्शन रांगेत थांबावे लागले.

धर्मदर्शन रांगेत सात ते आठ तास लागत होते तर ऑनलाईन तिकीट दर्शन देणगी दर्शनसाठी तिकीट घेण्यासाठी दोन तास आणि रांगेत दोन ते तीन तास तास चार तासाच्या वर वेळ लागत होता.

७००० हा देणगी दर्शन तिकिटांचा कोटा संपल्याने पुन्हाधर्मदर्शन रांगेत गर्दी वाढली होती



तिकीट कोटा संपत आल्यानंतर देवस्थान ट्रस्टकडून तिकीट विक्री केंद्रावर भाविकांना तिकिटे संपत( कोटा) आले असल्याची सूचना देऊन व भाविकांना धर्मदर्शन रांगेत जाण्याची विनंती करण्यात आली. अगोदरच धर्मदर्शन रांग तीन किलोमीटर पर्यंत गेलेली होती सकाळी साडेआठ वाजताच महाजन चौकात पोहोचली होती. तर मोफत दर्शन रांग मंदिर पूर्वदरवाजा ते भांगरे गल्लीच्या टोकापर्यंत आली होती. तर शिवप्रसाद तिकीट विक्री केंद्रावरील गर्दीची रांग माहेश्वरी धर्मशाळा कडे गेली होती. नाशिक त्र्यंबक रोडवर त्र्यंबक भागात मोठी गर्दी असल्याने नाशिक ते त्रंबक या प्रवासाला मोठा वेळ लागत होता ट्रॅफिक जाम सदस्य स्थिती होती. उद्या देखील गर्दी राहणार आहे निरनिराळ्या भागातील रंगांचे दृश्य पाहून भाविकांनी मंदिर चौकातूनच दर्शन घेणे पसंत केले भाविकांची संख्या लाखाच्या आसपास तर त्र्यंबकेश्वर मंदिरात जास्तीत जास्त १७ ते १८ भावीक दर्शन घेतात अशी सुविधा असते. त्यामुळे दूरवरून आलेले लोक यात्रेकरू दर्शनासाठी मोठी धडपड करताना दिसून येत होते.

# सटाणा पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी यांना विशेष सेवा पदक

**सटाणा । तालुका प्रतिनिधी।** महाराष्ट्र पोलीस संचालक यांच्या वतीने सटाणा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अमोल सूर्यवंशी यांना विशेष सेवा पदक जाहीर झाले असून, प्रजासत्ताक दिनाच्या नाशिक येथील कार्यक्रमात त्यांना गौरविण्यात येणार आहे.



नाशिक येथे राज्याचे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदानावर सूर्यवंशी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. सूर्यवंशी यांनी यापूर्वी राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यात धोडराज येथे नक्षलवादी परिसरात उल्लेखनीय कामगिरी केली असून, २०२२ ते २०२५ या कालावधीत सुमारे अकराशे नक्षलपाईक, तसेच दोन जिवंत बॉम्ब व दोन कुकर आयडी हस्तगत केले आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून ५०० मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच ७० आदिवासी मुलींना सुकन्या योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत असे विविध उपक्रम सूर्यवंशी यांनी राबविले आहेत.

सूर्यवंशी यांना यापूर्वी महाराष्ट्र राज्य शासनाच्या महिला बाल विकास विभागाच्या वतीने बालस्नेही पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच गतवर्षी पोलीस महासंचालकांच्या वतीने पदक देण्यात आले होते. सद्यस्थितीत सूर्यवंशी यांना पोलीस महासंचालक यांचे विशेष सेवा पथक जाहीर झाले आहे. विविध सूर्यवंशी यांचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिलकेकर, मालेगाव अप्पर पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, पोलीस उपाधीक्षक यशवंत बाविस्कर,सटाणा पोलीस निरीक्षक योगेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय राऊत, अतुल बोरसे आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# लातूर ते मुंबई लाँगमार्च येवल्यात दाखल

**येवला । प्रतिनिधी**

भीमराज सेनेच्या वतीने काढण्यात आलेला लातूर ते मुंबई लाँगमार्च येवल्यात दाखल झाला. यावेळी विंचूर चौफुली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील एका बारा वर्षीय चिमुरडीची हत्या झाली. या हत्येच्या निषेधार्थ चिमुरडीच्या कुटुंबियांना न्याय मिळावा यासाठी भीमराज सेनेच्या वतीने लातूर ते मुंबई मंत्रालय असा लाँग मार्च काढण्यात आला आहे. याप्रसंगी डॉक्टर



बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून लॉन्ग मार्च मुंबईच्या दिशेने निघाला आहे याप्रसंगी भीमराज सेनेचे प्रमुख राजाभाऊ थाटे, कॉ. भगवान चित्ते यांचेसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, येवल्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या लाँगमार्चला पाठिंबा दिला.

## फुगे विक्रेता जखमी

**मालेगाव ।** गॅस भरलेले फुगे विकतांना नायट्रोजन सिलेंडरचा स्फोट होऊन मुश्ताक हुसेन मोहंमद अंसारी हा फुगे विक्रेता गंभीर जखमी झाला. तो शहरातील गुलशननगर भागात फुगे विकत असतांनाच त्याच्या जवळील नायट्रोजन सिलेंडरचा स्फोट झाला. त्याला उपचारासाठी सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# विजय देवरे यांना पोलीस पदक जाहीर

**मालेगाव । प्रतिनिधी**



येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलिस उपनिरीक्षक विजय देवरे यांना राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाही र झाले आहे. त्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिस पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

विजय देवरे यांनी पोलीस विभागात मालेगाव शहर, पिंपळगाव, येवला यासह विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय येथे ३४ वर्ष उल्लेखनीय सेवा बजावली आहे. सध्या ते उपविभागीय पोलीस अधिकारी, मालेगाव कार्यालयात पोलीस उपनिरीक्षक (वाचक) पदावर कार्यरत आहेत. या सेवाकाळात त्यांना ४०० हून अधिक पारितोषिके मिळाली आहेत. त्यांच्या या उत्कृष्ट सेवेची पोलीस प्रशासनाने दखल घेत त्यांची राष्ट्रपती पदाकरिता शिफारस केली आहे. त्यांना राष्ट्रपती पोलिस पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांचे जिल्हा पोलीस प्रमुख बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धार्थ बारवाल याचेसह वरिष्ठ पोलीस अधिकारी व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.